# दलित कथा

डॉ. गंगाधर पानतावणे
प्रा. चंद्रकुमार नलगे

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

B154

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**दलित कथा : गंगाधर पानतावणे, चंद्रकुमार नलगे**
'चंद्रबन', साहित्य निवास कॉलनी,
उजळाईवाडी, कोल्हापूर.
फोन : ०२३१ - २६७७०३४

© **शितल मेहता**
कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये २००/-

शतका शतकांच्या
वेदनांना

# अनुक्रमणिका


- थड्यातील हाडं / अण्णाभाऊ साठे –२५
- कपाळी लिवल्यालं कंदी पुसंल? / बंधुमाधव –३४
- सांगावा / शंकरराव खरात –५३
- मरीआईला केला नवस ! / ना. रा. शेंडे –६७
- विद्रोह / बाबुराव बागुल –७५
- बांडगूळ / केशव मेश्राम –८८
- मजल्याचं घर / वामन होवाळ –१०९
- बेगड / योगीराज वाघमारे –१२१
- बळी / अविनाश डोळस –१३७
- रक्ताळलेली लक्तरे / योगेंद्र मेश्राम –१४४
- सत्येकाम वल्द जाबाली / अमिताभ –१५७
- हत्यार / भीमराव शिरवाळे –१६६
- चिंध्या / माधव कोंडविलकर –१७४
- उद्वेग / सुधाकर गायकवाड –१८४
- लेखक परिचय –२०२


✦ ✦ ✦

# कथेपूर्वीची कथा

शतकाशतकांची कोंडी फोडून मुक्त झालेल्या दलित-छलितांच्या जीवनाचं चित्रण आज दलित साहित्याच्या रथाने मराठी सारस्वतात येत आहे. मराठी साहित्याला अनोखे असणारे हे जे वेगळे दर्शन आहे, त्याची योग्य त्या तऱ्हेने विविध पातळींवर दखल घेणे क्रमप्राप्त ठरते. आम्ही असाच हा एक प्रयत्न केला आहे. दलित कवितेबरोबरच दलित कथेनेही दलित साहित्य (पर्यायाने मराठी साहित्य) समृद्ध होत आहे. दलित कथेमागच्या प्रेरणा आणि जाणिवा, तसेच दलित कथेचे विकासटप्पे ध्यानात घेऊन दलित कथांचे संपादन या संग्रहात केले आहे. दलित कथांचा हा पहिलाच संपादित कथासंग्रह आहे. यामध्ये दलित कथेच्या विकासाला योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न आम्ही आमच्या परीने केला आहे. दलित जीवनाचे विविध संदर्भ ध्यानी घेऊनच कथाकार आणि कथांची निवड केली आहे.

दलित लेखकांच्या कथांच्या संपादनाची निकड भासली आणि त्या दृष्टीने आम्ही पावले टाकण्याचा विचार केला. आमचा मानस संबंधित दलित लेखकांना कळविला. त्यांनी मोठ्या आत्मीयतेने प्रतिसाद दिला. संपादन सहजपणेच सुलभ झाले. या संग्रहात आपल्या कथा समाविष्ट करण्यास जिव्हाळ्याने परवानगी दिल्याबद्दल आम्ही त्याचे फारच ऋणी आहोत.

दलित कथांचे संकलन-संपादन करीत असता श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील प्रा. मधुकर वेदान्ते यांचे सौहार्दपूर्ण सहकार्य लाभले. ग्रंथपाल श्री. मधु गुरव, चिकित्सक सौंदर्यदृष्टी असलेले श्री. रवी चपाले यांचा जिव्हाळा या कार्यसांगतेपाठीमागे आहेच. तसेच ग्रंथालयातील

श्री. आनंदा शिंदे, धोंडीराम पाटील, शिवाप्पा मादर, प्रभाकर जरग यांचा मदतीचा हात वारंवार लाभला.

दलित कथांचे संपादन करीत असता सुप्रसिद्ध कवी प्रा. केशव मेश्राम, प्रा. फ. मुं. शिंदे, प्रा. बापूराव जगताप, गुरुवर्य ना. गो. शुक्ल, मराठी चित्रपट महामंडळाचे उपाध्यक्ष श्री. चंद्रकांत शेट्ये यांचे जे मौलिक मार्गदर्शन व सहकार्य लाभले ते विसरणे अशक्य !

या 'दलित कथा' पुस्तक स्वरूपात आणण्यात अजब पब्लिकेशन्सचे शितल मेहता यांचे व इतर अनेक अज्ञातांचे सहकार्य आहे. त्यांनाही धन्यवाद.

**– संपादक**



# दलित कथा : काही विचार

स्वातंत्र्योत्तर काळात ज्या नव्या वाङ्मयीन जाणिवा व प्रवृत्ती मराठी साहित्यात पायखुणा रोवू लागल्या; त्यात दलित साहित्याचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाने दलित अनुभवाला जाग आली आणि शतकानुशतकांच्या मौनाला वाचा फुटली. मनुष्यत्व नाकारलेल्यांच्या पीडेला अर्थ आला. पोथीनिष्ठा, अंधश्रद्धा, देव व दैवशरणता यांनी तुडवलेले मानवी मन नव्या विज्ञाननिष्ठ हुंकारांनी सजग झाले. नव्या जीवन जाणिवा कोंडीमुक्त होऊन नवा आशय आविष्कृत होऊ लागला. हा नवा आत्मशोध होता. ही नवी सांस्कृतिकता होती. अस्मितेचा हा नवा उद्‌गार होता. याचेच नाव दलित साहित्य. भारतीय संस्कृतीच्या तळाशी पेटलेले हे एक अग्निकुंड आहे. दलित कथा ही या अग्निकुंडातील एक ठिणगी आहे. मराठी कथावेलीला आलेले हे एक रसरशीत फूल आहे.

मराठी कथा विविध स्थित्यंतरातून व अनेक दिशांनी प्रवास करीत आली आहे. मराठीतील बव्हंशी कथा ही परंपरानिष्ठ व मध्यमवर्गीय जीवनाची आहे. असे म्हणता येईल की, मराठी कथा ही बंदिस्त कुटुंबवादी कथा आहे. कारण स्थितीशील मानसिकता जगणारा हा कुटुंबवाद आहे. त्यामुळे अधूनमधून वरपांगी मोडतोड, उलथापालथ वाटत असली तरी, अंतरंग भीषण अशा परंपराधिष्ठित मूल्यांशी तडजोड करणारेच आहेत. हरिभाऊंनी आपली 'गोष्ट' सांगितली ती नीती व बोधाच्या मर्यादा न उल्लंघिता. मध्यमवर्गीयांच्या दैनंदिन जीवनातील सुखदुःखे, माणसांची सुष्ट आणि दुष्ट अशी विभागणी, घटनाप्राधान्य यामुळे हरिभाऊ, त्यांच्यापूर्वीच्या अद्‌भुतातून वास्तवाकडे आले असले तरी, ते आपली

कथा कुटुंबचित्रणापलीकडे नेऊ शकले नाहीत. त्यांच्या काळातील आणि त्यानंतरही दोन दशके मराठी कथा या आवर्तांतून बाहेर पडू शकली नाही. फार तर नीती व बोधपरतेपेक्षा रंजनप्रधानतेचे बोट धरून काही कथा लिहिल्या गेल्या. १९२० च्या सुमारास दिवाकर कृष्णांनी मराठी कथेवर काव्यात्म अनुभवाचा साज चढविला आणि कथा हळुवारपणे वाचकांच्या अंतर्मनात प्रविष्ट झाली. परंतु फडक्यांच्या रेखीव तंत्रबद्धतेने आणि लालित्याच्या नोकझोकाने मध्यमवर्गीयांच्या 'प्रेमा'ला नवा स्पर्श झाला. कथेचा आरंभ आणि शेवट परिणामकारक व आकर्षक करण्याच्या सोसामुळे त्यांची कथा पुढे पुढे दारू जुनीच, पण दर्शनीय बाटली नवी असा प्रकार झाला. खांडेकरांचे तरी काय झाले? सामाजिक प्रश्नांचा मागोवा घेण्याचा त्यांचा कथात्म प्रयत्न कल्पनेच्या जगात वावरणारा होता. ध्येयवादाच्या काही ढोबळ कल्पना आणि अलंकरणाचा सोस, यामुळे कथेचा मूळ प्राण हरवून जाण्याची शक्यताच अधिक निर्माण झाली. त्यांच्या 'रूपककथा'नी मराठी साहित्याला योगदान दिले असे म्हटले जाते. परंतु केवळ कल्पनीयता आणि जीवनाची आभासमयता या पलीकडे या रूपककथांना चेहरा नव्हता. मध्यमवर्गीय कुटुंबवादापलीकडे खांडेकरांना जाता आले नाही. कलावाद आणि जीवनवाद हा आपल्याकडे वस्त्रगाळ झालेला वाद याच सुमारास रचनातंत्र आणि जीवनभाष्य यासंबंधाने पाय पसरू लागला होता. कला आणि नीती, साहित्य आणि समाज या वादांना जोर चढला आणि साहित्यनिर्मितीतही त्याचे प्रतिबिंब पडू लागले. पण मराठी कथा आपले 'मध्यमवर्गीयपण' जोपासूनच होती.

विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकाच्या आरंभापासूनच भारतीय जीवनात काही राजकीय व सामाजिक स्थित्यंतरे घडू लागली होती. म. गांधी, डॉ. आंबेडकर व मार्क्स यांच्या विचारांचा समाजमनावर विविध प्रकारचा प्रभाव पडू लागला होता. औद्योगिकतेनेही समाज ढवळून निघू लागला होता. या प्रचंड घडामोडींचा प्रभाव मराठी वैचारिक साहित्यावर थोड्या फार प्रमाणात पडू लागल्याचे दिसून येते. परंतु



वैचारिकतेतर लेखनावर त्यांचा विशेष प्रभाव नाही असे म्हणावे लागेल. गांधीवादाने राजकारण आणि समाजकारणाचा नवा वेष परिधान केला, तर आंबेडकरवादाने तळागाळातील माणसाच्या व्यक्तिमत्त्वालाही मोल आहे असे आक्रोशून सांगितले. मार्क्सवादाच्या मुशीतून रूजू लागलेला नवमतवाद, वर्गसंघर्ष, व्यक्तिस्वातंत्र्य अशा मूल्यांना परजू लागला. गांधीवादाने दलितांच्याकडे पाहाण्याची भूतदयावादी दृष्टी दिली, आंबेडकरवादाने दलितांना ताठ मानेने उभे राहण्याचे बळ दिले, तर मार्क्सवादाने श्रमिकांना जगण्याची जाणीव दिली. दलितांविषयीच्या सहानुभूतीचा विषय खांडेकर, माडखोलकर यासारख्या अनेक कथाकारांच्या कथांनी मांडला. 'चोरघडे गांधीवादी कथाकार आहेत.' असे कोणी म्हणत असले तरी, ग्रामीण जीवनापेक्षा अधिक महत्त्व त्यांनी दलित जीवनाला दिले नाही. श्रीपाद महादेव माटे यांच्या कथेतील दलितांविषयीची करूणा मात्र संवेद्य व भेदक होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व म. गांधी यांच्या सामाजिक प्रश्नांकडे व विशेषत: दलितांकडे पाहण्याच्या (संमिश्र) दृष्टीतून माट्यांची कथा घडलेली होती. दलितांविषयी वाटणाऱ्या सहानुभूती व जिव्हाळ्यामुळेच ते 'उपेक्षितांच्या अंतरंगा'त प्रवेशू शकले. त्याचवेळी बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेतून प्रभावित झालेले अनेक कलावंत 'आम्हालाही जगण्याचा अधिकार आहे' या मानवी प्रवृत्तीचा आपल्या कथाकवितांतून आविष्कार घडवीत राहिले. हा आविष्कार प्राधान्याने जगजागरणाच्या हेतूने प्रभावित झालेला होता. तुकाराम अंबादास पुरोहित या दलित कथाकाराने १९३३ साली 'प्रतिज्ञा' ही सनातनी व सुधारणावादी यातील अंत:संघर्षावर आधारित पहिली कथा प्रकाशित केली होती. त्यानंतरही त्यांच्या अनेक कथा प्रकाशित झाल्या.

मराठी कथेचा हा कालखंड काहीसा मध्यमवर्गीय जीवनावरून लक्ष विकेंद्रीत करणारा असला तरी, अपवाद वगळता मध्यमवर्गीय कथाकारच या कालखंडात बदलू पाहाणाऱ्या समस्यांना चितारीत होते. नवकथेच्या उदयानंतर मात्र, पुन्हा एकदा मध्यमवर्गीय जीवनाचा एका

वेगळ्या पद्धतीने आविष्कार घडू लागला. दुसऱ्या महायुद्धानंतर तर, भारतीय जीवनात व विशेषत: मध्यमवर्गात जी मोडकळ निर्माण झाली, व्यक्ती आणि समाजास जी यांत्रिकता आली. जुन्या श्रद्धांना तडा गेला, मानवी जीवनात एकूणच निरर्थकता, विसंगती, संभ्रमितता निर्माण झाली त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न नवकथेने केला. रंजनप्रियता, उद्देशपूर्णता, आदर्शरूपता व घटनाप्रधानता टाळून बंदिस्त अशा स्वरूपात मानवी जीवन उभे करण्याचा प्रयत्न केला. नवकथेने, उद्ध्वस्त होणारे माणसाचे जग जसे पाहिले तसे, माणसाच्या आशावादित्वाचा कोपराही शोधला. गाडगीळांसारख्या नवकथेच्या शिलेदाराने उपहासगर्भतेने माणसाचे किडलेले मन जसे उघड केले तसेच माणसाची विविध रूपेही त्यांनी चितारली. मानवी जीवनातील अंतर्विरोध व विसंगती त्यांनी टिपली. पण ही माणसे प्राधान्याने नागर मध्यमवर्गीय, शहरी जीवनातील होती. गाडगीळांच्या बरोबरच नवकथाकार म्हणून ज्यांची संभावना केली जाते, ते गोखले, भावे, व्यंकटेश माडगूळकर यांची कथा मात्र गाडगीळांपेक्षा काहीशी वेगळी आहे असे दिसून येईल. गोखले मानवी सुखदु:खाकडे निर्लेप मनाने पाहतात. त्यांच्या कथेला मध्यमवर्गीय कुटुंबाची भक्कम पार्श्वभूमी आहे. गाडगीळांप्रमाणे ते मनोविश्लेषणाचा उपयोग करीत असले तरी, माणसावर व त्याच्या भावसंबंधावर त्यांचे विलक्षण प्रेम आहे. गोखल्यांची कथा कुटुंबवादी कथेच्या परंपरेतील आहे. भाव्यांची कथा तर कथानक प्रधानच. आपल्या अनुभवाकडे ते तटस्थपणे पाहात नाहीत. रूढीपंरपरांचा व विशिष्ट सांस्कृतिक मूल्यांचा जाणीवपूर्वक वा नेणीवेनेही ते पुरस्कार करीत असतात. गोखल्यांप्रमाणेच भाव्यांची कथा संस्कारजन्य व जुन्या मराठी कथेशी नाते सांगणारी आहे.

व्यंकटेश माडगूळकरांचा नवकथाकारांत निर्देश करण्यापेक्षा, मराठी ग्रामीण कथेच्या संदर्भात त्यांच्या सामर्थ्याचा विचार करणेच अधिक श्रेयस्कर ! मराठी ग्रामीण कथा ही मराठी कथेची विकसनशील अवस्था होय. माडगूळकरांच्या ग्रामीण कथेत येणारी माणसे बव्हंशी स्थितीप्रवण आहेत. मात्र ठोकळ, दिघे, चोरघडे यांच्या सांकेतिक पद्धतीच्या



व्यक्तिचित्रपणापेक्षा माडगूळकर माणसांची वास्तवतापूर्ण चित्रे रेखाटतात. त्यांचे सूक्ष्म व वस्तुनिष्ठ निरीक्षण त्यातून प्रतीत होते. आता तर ग्रामीण कथा विविध अंगानी फुलोरून आली आहे. शंकर पाटील, द. मा. मिरासदार, रा. रं . बोराडे, आनंद यादव, मनोहर तल्हार, महादेव मोरे , चंद्रकुमार नलगे या कथाकारांचा त्यात प्रामुख्याने समावेश करावा लागेल. अलीकडे ग्रामीण कथेच्या नावावर किस्स्यांचे पेवही फुटू पाहत आहे. त्यामुळे जीवनातील वास्तवाचा स्पर्श हरवून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात झपाट्याने बदलू पाहणाऱ्या खेड्याचा दुभंगलेपणा, माणसांचे स्वभाव व जीवनपद्धती, याकडेही आता ग्रामीण कथाकारांनी लक्ष वेधले आहे. पण तरीही बव्हंशी ग्रामीण कथा, कौटुंबिकतेच्या व एकसुरीपणाच्या आवर्तात अडकून पडेल की काय, अशी भीती वाटते. ग्रामीण कथा म्हणजे गावाकडच्या गप्पा नव्हेत. ग्रामीण जीवनाला प्रचंड हादरे देणाऱ्या राजकीय व अन्य शक्ती उसळू पाहात आहेत. नवा शोषकवर्ग जन्माला आला आहे. त्याचे चित्रण पुरेसे झालेले नाही. काही वेळ मध्यमवर्गीय वेषातच ग्रामीण कथा हुंदडताना दिसते. ग्रामीण जीवनातील दडपली गेलेली भीषण सामाजिक सत्ये, उद्रेक, ग्रामीण कथेतून प्रगट झाले नाहीत हे दाहक वास्तव स्वातंत्र्योत्तर काळातील दलित कथेने आविष्कृत केले आहे.

१९६० नंतर मराठी कथेत एक परिवर्तन घडले. अस्तित्ववादाचा पदर धरून आणि संवेदनाप्रधानता ग्राह्य मानून व्यक्तीकेंद्री कथा जन्माला आली. माणसाच्या अंतर्मनातील अर्थ शोधण्याचा आणि त्याच्या अस्तित्वासाठी चाललेल्या पराकाष्ठेचा धागा पकडण्याचा प्रयत्न या कथेने केला. जी. ए. कुलकर्णी यांच्या कथेत भारावून टाकणारी रहस्यमयता असते. प्रतीकात्मतेच्या भाषेतून त्यांची कथा सतत वाचकांशी बोलत असते. पुष्कळदा ही कथा बौद्धिक परिवेष धारण करते. सजीव आणि निर्जीव सृष्टीचे सूक्ष्म निरीक्षण, क्रूरता, विद्रूपता याबरोबरच जीवनातील हळुवारपणा, कोमलता चित्रित करणारे जी. ए. कुलकर्णी हे आजच्या मराठी कथेचे सामर्थ्य आहे यात शंका नाही. पण ही कथा

मध्यमवर्गीय भावानुभावाशीच आपले नाते जोडते हे स्पष्ट आहे. मराठी कथेला भाषिक व बौद्धिक सौंदर्य देणारे जी. ए. कुलकर्णी हे नाव आता मराठी कथाविश्वात स्थिरपद झाले आहे. कमल देसाई, दिलीप चित्रे यांच्या कथेनेही भोवतालच्या परिस्थितीचे, आजच्या जीवनातील विसंवादाचे भान राखले आहे. आजच्या मध्यमवर्गीय जाणिवांचे विविध पदर ते उलगडत जातात. माणसाचा भूतकाळ व भविष्य यातील सलगता, माणसामाणसातील कोरडे संबंध, थंडपणा इ. धारदारपणे ते मांडतात. दिलीप चित्रे स्त्री-पुरुषसंबंधातील यांत्रिकतेचे जे दर्शन घडवितात, ते बीभत्स वाटावे इतके व्यंगदर्शी आहे. संस्कृतीचे ते एक नागडे चित्रच होय.

जयवंत दळवी, विद्याधर पुंडलिक, श्री. दा. पानवलकर, ह. मो. मराठे इ. आजचे कथाकार मध्यमवर्गीय कुटुंबवादी जीवनाचे चित्रण अतिशय भेदकपणे चित्रित करतात.

आजच्या मराठी कथेची विविध रूपे लक्षात घेतानाच दलित कथेने रूंदावलेले मराठी कथेचे क्षितिज दृष्टीपथात येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने व प्रखर नेतृत्वाने दलित जागा झाला. त्याच्या इच्छा आकांक्षाना पंख फुटले. संघर्षाची दीक्षा दिली. हा नवा प्रत्यय होता. या नव्या प्रत्ययाचे चित्र दलित कथेत प्रगट होते. दलिताचे जीवन दुर्लक्षित, नाकारलेले, व्यथा-वेदनांत ढकलून दिलेले आणि त्यामुळे ह्या जीवनाला एक वेगळी रग आहे. धर्मकल्पना, जातीरूढीची जाचक बंधने यात रूतून बसलेले हे जीवन मध्यमवर्गीय व पांढरपेशी नाही. स्वत्वाची जाणीव होताच, या जीवनाने पूर्वसंकेत नाकारले. सहानुभूती आणि दयेचा अस्वीकार केला. भारतीय समाजव्यवस्थेने निर्माण केलेल्या मानसिकतेतून आत्ममुक्ती करणारे हे मन नव्या परिवर्तनवादी संस्कृतीचा स्वीकार करू लागले. मराठी कथेला हे नवे आहे. बौद्धिक, संज्ञाप्रवाही किंवा भाषासौंदर्याची कास न धरता निखळ जीवनदर्शनाचा सोस असलेली ही कथा आहे प्रस्थापित मूल्यांविरुद्ध ही केवळ विध्वंसक प्रतिक्रिया नाही, तर रचनेचा स्पर्श असलेली ही मानवी पृथुगात्मता आहे. प्रचंड





अनुभवाचे ओझे वागविणारे दलित मन कथा-कवितेतून व्यक्त होताना केवळ 'मनुष्यत्वाची प्रतिष्ठा'च शब्दांकित करते असे नाही तर, सांस्कृतिक व सामाजिक संबंधाचे अटळ स्वरूप प्रतिपादन करते. समाजव्यवस्थेच्या दास्यवृत्तीचे विश्लेषण व सामाजिक यातनाचक्र मराठी ग्रामीण कथेला खोलपणे पकडता आले नाही. दलित कथेने मात्र मराठी कथा विश्वाला ही देणगी दिली. माटे मास्तरांनी 'उपेक्षितांचे अंतरंग' उलगडून दाखविले ते सहानुभूतीच्या माध्यमातून, पण आजची दलित कथा मानसिक व शारीरिक दास्याचं, दु:खाचं चित्र रेखाटते ते भारतीय समाजव्यवस्थेच्या तळाशी खदखदणाऱ्या सांस्कृतिक ज्वालामुखीचे रूप घेऊन. त्यामुळे एकीकडे नकार आणि दुसरीकडे स्वीकार यातील द्वन्द्व दलित कथा अचूकपणे टिपते. कधी ती सामाजिक व सांस्कृतिक दंभाचा स्फोट करते, तर कधी ती अंतर्गत ताणतणावांना सामोरी जाते. कधी ती अंतहीन दु:खाच्या व्यवस्थेची मूलभूतता शोधते, तर कधी माणसांच्या श्रेणीबद्धतेची मानसिकता छिन्नभिन्न करते. एक मात्र निश्चित की, दलित कथा ही आपल्या सांस्कृतिक दु:खाचे प्रदर्शन करीत नाही, तर दर्शन घडविते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मुक्तिसंग्रामाबरोबरच दलित कथेचा जन्म झाला. ना. रा. शेंडे, तुकाराम अंबादास पुरोहित, नारायण शिवडावकर, यादव भिकाजी गांगुर्डे, हिंदु गोविंद बनसोडे इ. कथाकारांनी दलितांची दु:खे वेशीवर टांगण्याचा प्रयत्न केला. कधी भावविवश होऊन, तर कधी आतल्या आत गुदमरून ही कथा प्रारंभी आपल्या वेदना मुखरित करण्याचा प्रयत्न करू लागली. टाहो फोडण्याचा प्रयत्न करू लागली. परंतु आवाज हाकेपलीकडे जात नव्हता. दलितांच्या 'जनता' सारख्या पत्रातूनही कथा प्रकाशित होत होत्या. पीडानिवेदनाच्या पातळीवर ही कथा होती. म्हणून तिला प्रयोगाचा स्पर्श नव्हता की, रंजनतेचा स्वप्नाळूपणातही ती रमत नव्हती. अस्पृश्य म्हणून सोसाव्या लागलेल्या मानहानीला, या अस्पृश्यतेला कारणीभूत नियतीही आहे आणि कृत्रिम समाजरचनाही. अशा संमिश्र भावनांचा तो प्रांजल आविष्कार होता.

सहानुभूतीपरते पेक्षा शब्दांकित होणारी स्ववेदना गदगदून मांडली जात होती. हळूहळू दलित कथेला स्वत:चा सूर सापडत होता. ती आत्मशोध घेऊ लागली.

दलित कथा ही आत्मशोध करणारी कथा आहे. म्हणून ती इतिहास जाणून घेते आणि वर्तमानाचे भान राखते. 'अस्पृश्यत्व' हे धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक कारणांचे फलित आहे. हा अनुभव सामाजिक बधिरता निर्माण करतो, आणि सलग सामाजिकताही चित्तथरारक द्वन्द्वमूलता दलित कथेतून प्रगट होऊ लागली. एकीकडे ग्रामीण कथा, अस्तिवत्वादी कथा, भरास असतानाच आपल्या अंगभूत सामर्थ्याने दलित कथा आकाराला आली. ती एक अपरिहार्यता होती.

अण्णाभाऊ साठे यांनी 'आबी'च्या प्रस्तावनेत म्हटले होते, 'जे जीवन जगलो, जे जीवन अनुभवले तेच मी लिहीत आहे.' ज्या माणसांची दु:खे, व्यथावेदना, त्यांनी चितारली ती त्यांची होती. त्यांच्या कल्पनेतल्या जगातली नव्हती. माणुसकीसाठी, भाकरीसाठी, बेभान झालेल्या माणसांच्या वृत्ती तितक्याच बेभान, भडक व खोट्या वाटण्याची शक्यता एखाद्या समीक्षकांने नोंदवली तर आश्चर्य नाही. परंतु कोणत्याही कृत्रिमतेने, किंवा कृत्रिम कल्पनांच्या जाळींनी त्यांनी आपली माणसे व जीवन विणलेले नाही. ती आहेत तशी उघडी बोडकी मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला. म्हणून ती वाचकांना बेताल, बेबंद व मर्यादा मोडणारी वाटली. परंतु अन्याय जुलुमाच्या रगाड्यात सापडलेली माणसे सहनशीलतेचे बंध झुगारून कसे बंड करतात, बेभान होतात याचं दर्शन अण्णाभाऊंच्या अनेक कथात होतं. ते प्रारंभी मार्क्सवादी होते. कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते होते. पण या विचार घडणीचा उपयोग त्यांनी त्यांच्या प्रचारी लोकनाट्यात केला. हे येथे लक्षात घेतले पाहिजे. अर्थनिष्ठ मार्क्सवादी प्रेरणेची छाया त्यांच्या कथा-कादंबऱ्यावर नाही हे 'फकिरा' किंवा 'खुळंवाडी' मधील कथा वाचताना जाणवते. त्यांनी 'फकिरा' ही कादंबरी, ज्यांच्याविषयी त्यांनी लिहिले होते, 'जग बदल घालुनी



घाव । सांगून गेले भीमराव ।।' त्या बाबासाहेब आंबेडकरांना अर्पण केली आहे, हे अत्यंत बोलके आहे आणि 'फकिरा' ही कादंबरी मार्क्सवादी प्रेरणेचे अपत्य नाही हे त्यातील समाजव्यवस्थेने निर्माण केलेले जीवन, त्यातील दुष्टचक्र पाहिले की, प्रतीत होते. दलितांचे जीवन हे केवळ गुन्हेगारीचे, दुर्गुणांचे, ध्येयशून्यतेचे, भणंगपणाचे आहे असे नाही तर याही जीवनात, माणुसकीची अर्थपूर्णता, प्रबल इच्छाशक्ती, आशाआंकाक्षा, निष्ठा, मानव्याविषयी सजगता यांचे अस्तित्व आहे हे अण्णाभाऊंनी आपल्या कथांतून प्रतिपादन केले. त्यांनी चितारलेली माणसे त्यांच्या रक्तामांसाची होती. वारणेच्या खोऱ्यात, कृष्णाकाठी, खुळंवाडीच्या अवतीभवती वावरणारी होती. या माणसांची भाषा त्यांची स्वत:ची होती. या भाषेतूनच अण्णाभाऊंनी त्यांचे व्यक्तिमत्त्व उभे केले. एका टीकाकाराने त्यांच्या कथेसंबंधी म्हटले की, 'अश्लील व अशिष्ट शब्द येतात म्हणून ती कथा हिणकस ठरते.' सांस्कृतिकतेचा मुखवटा न चढविणारी अण्णाभाऊंची माणसे आपल्या स्वत:च्या भाषेत बोलत होती. ती कृत्रिमता नव्हती की कृतकता. तो मराठबोलीचा नैसर्गिक वाण होता. जीवनाचे वास्तवच इतके भीषण व दाहक होते की, त्यांना कृत्रिमतेचा, अवास्तवाचा रंग देण्याची गरजच नव्हती. मराठी कथाविश्वाला व मराठी मनाला हे नवे होते. त्यामुळे त्यांच्या कथेवर व्यक्त होणारी उपरोक्त प्रतिक्रिया ही पारंपरिक घडणीची आहे एवढेच म्हणता येईल.

अण्णाभाऊंच्या साहित्यावर एकसुरीपणाचा, रंजकतेचा किंवा रामरावण पार्टीचे युद्ध असल्याचा आरोप केला जातो. या आरोपात अल्पांशी तथ्य असले तरी, तो आरोप त्यांच्या फार नंतरच्या साहित्यासंबंधाने विचारात घेता येईल. त्यांचे सर्वच साहित्य रंजनवादी आहे असे म्हणणे वस्तुस्थितीचा विपर्यास करण्यासारखे होईल. वास्तविक अशा प्रकारचे त्यांचे उत्तरायुष्यातील लेखन म्हणजे परिस्थितीने त्यांच्यावर उगवलेला सूड होता. जीवनातील अस्थिरता, गुंतागुंत आणि अगतिकता यांना वाट देण्यासाठी त्यांनी स्वीकारलेली ती तडजोड होती.

पण या तडजोडीतही त्यांची सामाजिक संवेदना जागी होती. हे नाकारता येत नाही.

ना. रा. शेंडे यांच्या कथालेखनाला आरंभ १९३० च्या सुमारास झाला. त्यांच्यापुढे फडके-खांडेकरांची कथा होती. या कथांच्या आदर्शाने झपाटलेले शेंडे, आपल्या माणसांची सामाजिक दु:खे चितारताना अनेकदा हळवे बनलेले दिसतात. परिस्थितीशरण माणसांची दैना आणि त्यांची असहाय्यता ते नियतीच्या हवाली करतात. म्हणून ती माणसे सोशिक वाटतात. दुभंगून गेलेली वाटतात. आत्मतेजाने खवळून उठणारी वाटत नाहीत. पण समाजव्यवस्थेने चिरडून टाकलेली त्यांची माणसे अशीच नीतीशरण असतात हे एक सत्य त्यांच्या कथांतून प्रगट होते. शेंड्यांची कथा बंडखोर नाही किंवा कृत्रिमतेचे बंध झुगारून देणारी नाही. मात्र ती अनुभवांची नोंद सातत्याने करीत राहते. शेंड्यांची कथा विपुल नसली तरी, तिचे काळमूल्य नाकारता येत नाही.

डॉ. बाबासाहेबांच्या विचारांनी झपाटलेली मने परिवर्तनसन्मुख होताच त्या मनांनी जुने झुगारून नव्या आत्ममूल्यांशी नाते जोडले. त्यामुळे स्वाभाविकच जीवनाला एक उग्र रूपही आले. या उग्रतेतून संघर्षाला कळत वा नकळत सामोरे जाणे भाग होते. परिवर्तनाला संघर्ष अटळ असतो. बंधुमाधव या कथाकाराने या संघर्षाचे, त्यातून संभवणाऱ्या ताणतणावांचे, स्वत्वासाठी झुंजणाऱ्या मन:प्रवृत्तीचे चित्रण आपल्या कथांतून केले. आम्हालाही माणूस म्हणून जगायचे आहे. या जिद्दीने उसळून आलेल्या माणसांचे मानस बंधुमाधवांनी नेमकेपणे पकडले. क्रूर समाजव्यवस्थेला नकार आणि आत्मप्रतिष्ठेसाठी सर्वस्वाचे बलिदान करण्याची निष्ठा आणि विद्रोह या प्रवृत्ती त्यांच्या कथेतून प्रकट झाल्या. बंधुमाधवांच्या 'वतनी कथा' म्हणजे दलितांच्या अस्मितेची जागच. अंधाराला कवटाळणारा आणि अंधारातून प्रकाशाकडे बेधुंदपणे जाणारा या दोन्ही अवस्था एकाच व्यवस्थेतून संक्रांत होत असतात. बंधुमाधवांनी या व्यवस्थेच्या मुळातील सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न कित्येक कथांतून घेतलेला आहे. ते आकृतीबंधाच्या ठरीव साच्याचा विचार करीत नाहीत.





कारण जे जीवन चितारायचे आहे ते या ठरीव साच्यात मावण्यासारखे नव्हते. दलितांच्या विविध अवस्थांचे चित्र जसे ते रेखाटतात, तसेच विविध मानसिक आंदोलनांचे चित्रही ते तितक्याच प्रत्ययकारकतेने व प्रखरतेने चितारतात. दलित कथेतील विद्रोह आणि नकाराच्या जाणिवा बंधुमाधवांच्या कथेत सर्वप्रथम प्रगट झालेल्या आहेत.

बंधुमाधवांबरोबरच शंकरराव खरात आणि बाबुराव बागुल या दोन श्रेष्ठ दलित कथाकारांची कथासृष्टी लक्षणीय आहे. दोहो कथाकारांच्या कथेत दलितांच्या दैन्यांचे, दारिद्र्याचे, अपमानाचे, संघर्षाचे, लाचारीचे, वास्तवदर्शी चित्र येते. बागुल यांची कथा मात्र स्फोटक व विश्लेषक अशा स्वरूपाची आहे. अनावर व सैरभैर होणारी बागुलांची कथा जीवनाचे विदारक वास्तव प्रगट करताना भीषणरौद्र रूप धारण करते. शिरीष पै यांनी म्हटल्याप्रमाणे ती चौकटीत न मावणारी कथा आहे. पांढरपेक्षा जगाचा वारा न लागलेली ही कथा अज्ञात व दुर्लक्षित जीवनातील दाहकता, भीषणता व उग्रता ज्या सहजतेने चितारते तितक्याच सहजतेने जीवनातील हळुवारपणा, भव्यता, कोमलता, उत्तुंगता, नीतीमत्ताही चितारते. बागुलांचे लेखन खरातांच्या तुलनेत अल्प असले तरी, ते बेधुंद वाहाणाऱ्या प्रपातासारखे आहे. शंकरराव खरातांचे कथालेखन संथ व शांत प्रवाहासारखे, पण विलक्षण सामाजिकता प्रगट करणारे आहे.

खरांताचे कथालेखन विपुल आहे. समाजातील वास्तवचित्रे ते शब्दबद्ध करतात. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रमाणेच जे अनुभवले, पाहिले तेच त्यांनी चित्रित केले आहे. त्यांची निरीक्षणशक्ती व्यापक तशी सूक्ष्मही आहे. म्हणूनच समाजजीवनातील अनेक तपशील त्यांच्या कथेत येतात. दलित जीवनातील समाजशास्त्रीय तपशील देणारे खरात हे एकमेव कथाकार. ग्रामसंस्थेतील स्पृश्य आणि अस्पृश्य, तसेच ग्रामसंस्थेशी निगडित असणाऱ्या उपेक्षित जमातींचे चित्रण खरात अत्यंत सहृदयतेने रेखाटतात. दलितांचे जीवन ज्या अंधश्रद्धांनी विस्कटले आहे, त्यामुळे त्यांच्या जीवनात निर्माण झालेले दु:ख यासंबंधीची अनेक करूणचित्रे